प्रेसनोट दि. १५/०६/२०१८ खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर

**महिलांचे गळयातील दागिने पळविणा-या रेकॉर्डवरिल गुन्हेगारांना रंगेहात मुदेमालासह खडकी पोलीसांनी पकडले.**

दि. ०७/०६/२०१८ रोजी सकाळी १०.५० वाजणेचे सुमारास शेवाळे हॉस्पीटल समोर औध रोड खडकी या भागात महिला नामे लता सुब्रमण्यम हया फुटपाथवरुन पायी जात असताना एका मोटारसायकल वरील दोन इसमांनी सदर महिलेच्या गळयातील मंगळसूत्र पळविल्याची माहिती खडकी पोलीस स्टेशन येथे प्राप्त होताच मा. दिपक साकोरे, पोलीस उप-आयुक्त, परि-४, पुणे व मा. गणेश गावडे, सहा. पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे लक्ष्मण बोराटे, वपोनि, व अजित लकडे, पोनि, गुन्हे, खडकी पोलीस स्टेशन यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशन व विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे कर्मचारी हे खडकी परिसर व गुन्हा घडलेल्या परिसरात पेट्रोलिंग करत असतना पोशि हेमंत माने, पोशि तुषार शिंदे, पोना किरण घुटे, पोना विनायक मुधोळकर, पोशि सुभाष आढाव, पोशि किशोर दुशिंग यांनी पोलीस उप-निरीक्षक महाडिक यांना कळविले की, औध रोडने साई मंदिराच्या दिशेने एका नंबर नसलेल्या पल्सर मोटारसायकल वरुन आंबेडकर चौकाकडून साईमंदिराकडे येत असल्याचे कळविल्याने त्याप्रमाणे त्यांना पकडण्याकरिता त्यांनी सापळा लावला. तरी सुध्दा ते पोलीसांना हुलकावणी देवून आयप्पा मंदिराकडे जाणा-या रोडने सुसाट भरधाव वेगाने निघून जावू लागले म्हणून स्टाफने आपआपल्या खाजगी वाहनांनी त्यांचा पाठलाग करुन काही अंतरावर त्यांना पकडून त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपला नाव पत्ता १. परेश किशोर धावरी वय २८ वर्षे रा शंकरराव चौक गुजराती शाळेजवळ सफाई कामगार वस्ती घर नं १७ कल्याण पश्चिम जिल्हा पुणे २. आकाश राजेश कंडारे वय २२ वर्षे रा रा शंकरराव चौक गुजराती शाळेजवळ सफाई कामगार वस्ती घर नं १७ कल्याण पश्चिम जिल्हा ठाणे असे सांगितले. त्यांची झडती घेतली असता झडतीमध्ये त्यांचेकडे सोन्याचे मंगळसूत्र मिळून आले ते दाखल गुन्हयातील फिर्यादी यांचे मंगळसूत्र असल्याचे निष्पन्न झाले. त्याने खडकी पो स्टे गुरनं १९०/१८ भादवि ३९२ ३४ हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांची पोलीस कोठडी रिमांड घेवून तपास करुन त्याचेकडून खालील ९ दाखल गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून खालील गुन्हयातील चोरीस गेलेले दागिन्यापैकी १९३ ग्रॅम सोन्याचे दागिने किंमत रु ५,९५,५००/- चे जप्त करण्यात आलेले आहेत.

१. खडकी पो स्टे गु र नं १९०/१८ भादवि ३९२ ३४
२. खडकी पो स्टे गु र नं २५/१८ भादवि ३९२ ३४
३. खडकी पो स्टे गु र नं ८६/१८ भादवि ३९२
४. खडकी पो स्टे गु र नं ९७/१८ भादवि ३९२ ३४
५. खडकी पो स्टे गु र नं १९३/१८ भादवि ३९२ ३४
६. खडकी पो स्टे गु र नं १४२/१८ भादवि ३९३ ३४
७. लष्कर पो स्टे गु र नं ४९/१८ भादवि ३९२ ३४
८. लष्कर पो स्टे गु र नं १२६/१८ भादवि ३९२ ३४
९. दिघी पो स्टे गु र नं १२७/१८ भादवि ३९२ ३४

सदर कामगिरी परिमंडळ ४ पुणे चे पोलीस उप-आयुक्त दिपक साकोरे सो, खडकी विभागाचे सहा. पोलीस आयुक्त गणेश गावडे सो यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री लक्ष्मण बोराटे व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री अजित लकडे, तपास पथकाचे पोलीस उप-निरिक्षक निलेश महाडिक, पोलीस कर्मचारी हेमंत माने, तुषार शिंदे, किरण घुटे, अंण्णा ठोकळ, रणधीर माने, सुरेश गेंगजे,लक्ष्मण बांगर,बाबा शिर्के, अशोक शेलार, विशाल मेमाणे, गणेश लोखंडे, प्रदिप गाडे - सर्व नेमणुक खडकी पो स्टे व विनायक मुधोळकर, सुभाष आढाव, किशोर दुशिंग - नेमणुक विश्रांतवाडी पो स्टे यांनी केलेली आहे.